# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199    Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-२३ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १७ ते २३ फेब्रुवारी २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

## सुट्टी सिगारेट, बिडी विकण्यास महाराष्ट्रात आरोग्य विभागाची बंदी!

### शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, धार्मिक स्थळांच्या १०० मीटर परिसरात विक्री बंदी लागू

**मुंबई :** महाराष्ट्रात जेव्हा कोरोना वेगाने पसरत होता तेव्हा आरोग्य विभागाने राज्यातील कोणत्याही पान बिडी दुकानात सुट्टी सिगारेट व बिडी विकायला बंदी घातली होती. त्यानंतर राज्यात काही साथरोग आले. आता जीबीएसने धुमाखूळ घातला आहे मात्र आरोग्यविभागाच्या या आदेशाची असून पोलीस व महापालिका व खुद्द आरोग्य विभागाकडूनच कोणतीही अंमलबजावणी होताना दिसत नाही. महाराष्ट्रात शाळा - कॉलेजमधील तरुणाई मोठ्या प्रमाणात तंबाखूजन्य पदार्थ म्हणजे सिगारेट पासून गुटख्याच्या अहारी गेले आहे. वेळोवेळी राज्यातील अनेक सरकारांनी दारुबंदी, सिगारेट तसेच तंबाखूजन्य पदार्थांच्या प्रसारावर नियंत्रण आणण्यासाठी अनेकदा बैठका घेतल्या आहेत.


आरोग्य विभागाने यापूर्वी सुट्टी सिगारेट व बिडीची विक्री होऊ नये यासाठी विधी व कायदा विभागासह सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता. मात्र विधी विभागाकडून पुरेसे पाठबळ न मिळाल्याने आरोग्य विभागाला याबाबत आदेश काढता आला नव्हता, असे आरोग्य विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यानच्या शाळी- म हाविद्यालये तसेच रुग्णालये व धार्मिक स्थळांच्या शंभर मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी लागू करण्यात आली. मात्र त्याचीही ठोस अंमलबजावणी आजपर्यंत कोणताही संबंधित विभागाने केलेली नाही. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे याबाबतच्या केंद्राच्या कायद्याचे पालन महाराष्ट्र ात कायदा अस्तित्वात आल्यापासून कधीच करण्यात आले नाही. 'सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादन कायदा २००३' या अंतर्गत सिगारेट किंवा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करतेवेळी पाकिटाच्या ८५ टक्के भागावर सिगारेट वा बिडी आरोग्याला घातक असल्याचा संदेश स्पष्ट शब्दात छापणे बंधनकारक आहे. सिगारेट पाकिट अथवा बीडी बंडलाची विक्री केल्यास कायद्यात अपेक्षित असलेला उद्देश म्हणजे 'आरोग्याच्या धोक्याची कल्पना' हा साध्य होतो.



## हिंदू समाजाला एकत्र करणे हेच संघाचे उद्दिष्ट : मोहन भागवत

**कोलकाता (वृत्तसंस्था):** देशासाठी जबाबदार असलेला समाज हा हिंदू आहे. त्यामुळेच संघाचे उद्दिष्ट फक्त हिंदू सम ाजाला एकत्र करणे आहे, असे ठाम मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी पश्चिम बंगालमध्ये १० दिवसांचा दौरा केला. त्याच दौऱ्याची रविवारी जाहीर सभेने सांगता झाली आहे. या सभेला संबोधित भागवत पुढे म्हणाले की,देशभरात १ लाख ३० हजारांहून अधिक स्वयंसेवक आहेत.



तो कोणाकडूनही पैसे घेत नाही, तो स्वतः काम करतो. म्हणूनच आम्ही म्हणतोय की, आम्ही हे प्रसिद्ध होण्यासाठी करत नाही आहोत, तर भारताच्या प्रगतीत अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी आम्ही हे करत आहोत.

पुढे ते म्हणाले,ड्ढभारताला एक निसर्ग आहे आणि ज्यांना वाटले की ते त्या निसर्गासोबत राहू शकत नाहीत. त्यांनी स्वतःचा वेगळा देश निर्माण केला. हिंदू जगाच्या विविधतेचा स्वीकार करून पुढे जातात.आजकाल आपण विविधतेत एकता म्हणतो, हिंदूंचा असा विश्वास आहे की एकतेत विविधता आहे.

रामायणातील दाखले देत संघप्रमुख म्हणाले की,ड्ढइथे राजे आणि सम्राटांची आठवण कोणालाच नाही पण तो राजा आठवतो ज्याने आपल्या वडिलांसाठी १४ वर्षे वनवासात घालवला आणि ज्याने आपल्या भावाचे चप्पल ठेवले आणि परतल्यावर आपल्या भावाला राज्य दिले. मोहन भागवत यांनी पश्चिम बंगालच्या दहा दिवसांच्या दौऱ्यात त्यांनी संघाच्या अनेक नेत्यांसोबत अनेक बैठका घेतल्या.

यामध्ये त्यांनी संघाचे संघटन बळकट करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याशिवाय, मोहन भागवत यांनी आरजी कार मेडिकल कॉलेज बलात्कार प्रकरणातील पीडितेच्या पालकांचीही भेट घेतली.

दरम्यान भागवत यांचा हा पश्चिम बंगाल दौरा म्हत्त्वाचा मानला जात आहे, कारण येत्या काळात पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्याचबरोबर शेजारील देश बांगलादेशशी संबंध बिघडलेले आहेत. त्यामुळे बंगालच्या सीमावर्ती भागात तणाव आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पुढील वर्षी राज्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत.

## प्रत्येकाला गंगा मातेचा आशीर्वाद मिळेल - गडकरी

**प्रयागराज :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पत्नी आणि कुटुंबासह महाकुंभ संगमात स्नान करून पूजा केली. यावेळी माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, गंगा स्नान आणि दर्शन पूजा खूप छान झाली. आपल्या नागपूर शहरातून हजारो लोक आपली वाहने घेऊन येथे येत आहेत. आम्हाला वाटते की प्रत्येकाला गंगा मातेचा आशीर्वाद मिळेल, अशी प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. सोशल मीडियावर पवित्र स्थानाचे फोटो पोस्ट केले आहेत. आज प्रयागराज म हाकुंभात, मला पवित्र संगमात स्नान आणि पूजा करण्याचे सौभाग्य मिळाले! शुद्ध, निर्मळ माता गंगेचा आशीर्वाद मिळाला, असं म्हटलं.

महाकुंभाचा आज ३५ वा दिवस होता. आत्तापर्यंत ५१ कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र संगमात स्नान केले आहे. महाकुंभाला अजून १० दिवस बाकी आहेत. त्याम ुळे इथं स्थान करणाऱ्यांची संख्या ५५ कोटींच्या जवळपास पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

त्याआधी गडकरी कुटुंबासह प्रयागराजला पोहोचले होते. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विमानतळावर त्यांचे स्वागत केले. यावेळी गृह सचिव संजय प्रसाद हेही उपस्थित होते. महाकुंभ स्नानासाठी गडकरी आल्याने भाविकांमध्ये उत्साह दिसून आला.

## खोटे बोलून, खोटी ओळख दाखवून लग्न करणे चुकीचे - देवेंद्र फडणवीस

नागपूर: खोटे बोलून आणि खोटी ओळख दाखवून लग्न करणे चुकीचे आहे, असे स्पष्ट करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'लव्ह जिहाद' कायद्याचे रविवारी समर्थन केले. नागपूर येथे पत्रकारांशी बोलत असताना फडणवीस यांनी लव्ह जिहाद विरोधात म हायुती सरकार कडक कार्यवाही करणार असल्याचा मानस व्यक्त केला. राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयात ही घोषणा करण्यात आली असून समितीचे सदस्य कोण असतील, त्याची कार्यपद्धती कशी असेल? याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत, असे ते म्हणाले. याबाबत अधिक बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, लव्ह जिहाद याची वास्तविकता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात आली आहे.

केरळ उच्च न्यायालयानेही याचा उल्लेख केला आहे. एका धर्मातील व्यक्तीने दुसऱ्या धर्मातील व्यक्तीशी लग्न करण्यात गैर काही नाही. पण खोटे बोलून, खोटी ओळख तयार करून, फसवणूक करून लग्न करायचे आणि मुले जन्माला घालून सोडून द्यायचे, ही प्रवृत्ती समाजात पसरत आहे. जाणीवपूर्वक खोटारडेपणा करणे योग्य नाही. त्यामुळे यासंदर्भात जी काही कार्यवाही असेल ती राज्य सरकारकडून केली जाईल.

दरम्यान, महाराष्ट्र सरकारनेही आता लव्ह जिहाद आणि जबरदस्तीने धर्मांतर करण्याविरुद्ध कारवाई करण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी सरकारने राज्य पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती स्थापन केली. ही समिती लव्ह जिहाद आणि सक्तीचे धर्मांतर थांबवण्यासाठी कायदेशीर उपाययोजना सुचवणार आहे. महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक यांना या समितीचे अध्यक्ष करण्यात आलंय.

इतर अनेक राज्यांमध्येही राज्य सरकारांनी कथित लव्ह जिहाद आणि जबरदस्तीने धर्मांतर थांबवण्यासाठी पावले उचललीत आणि आता महाराष्ट्रदेखील यात सामील होणार आहे.

जबरदस्तीने धर्मांतर रोखण्यासाठी समिती उपाय योजणार - लव्ह जिहाद हा शब्द अनेकदा उजव्या विचारसरणीचे कार्यकर्ते आणि संघटना वापरतात, असा आरोप बऱ्याचदा केला जातो. मुस्लीम पुरुषांकडून हिंदू मुली किंवा महिलांशी लग्न करून त्यांना इस्लाम धर्मात रूपांतरित करणे म्हणजेच लव्ह जिहाद असल्याचे बोलले जाते.

महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या समितीमध्ये महाराष्ट्राचे डीजीपी, महिला आणि बाल कल्याण विभाग, अल्पसंख्याक विभाग, कायदा आणि न्याय विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि विशेष सहाय्य विभागाचे सचिव तसेच गृह विभागाचे उपसचिव यांचा समावेश आहे.

राज्य सरकारने शुक्रवारी या संदर्भात आदेश जारी केलेत. आदेशात म्हटले आहे की, अभ्यासानंतर समिती लव्ह जिहाद आणि जबरदस्तीने धर्मातर करण्याच्या घटनांना सामोरे जाण्यासाठी कोणते उपाय योजता येतील हे सांगणार आहे. ही समिती इतर राज्यांमधील यासंबंधीच्या कायद्यांचाही अभ्यास करणार असून, धर्मातर थांबवण्यासाठी तरतुदीदेखील सुचवेल आणि त्याच्या कायदेशीर पैलूंची सुद्धा चाचपणी केली जाईल.

# ‘अद्वितीय महानायक-छत्रपती शिवराय’

इतिहास त्यांचाच लिहिला जातो ज्यांनी आपल्या कर्तुत्वाने लोकोत्तर,असामान्य कार्य केले आहे.जगाच्या इतिहासात ज्या कर्तबगारांनी आपल्या पराक्रमाने,शौर्याने,बुद्धी चातुर्याने आणि सर्वसमावेशकतेने आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले,त्यामध्ये महाराष्ट्र राज्याची अस्मितादर्श छत्रपती शिवाजी महाराज हे अग्रगण्य होय.शिवाजी महाराजांचे संपूर्ण जीवन म्हणजे पराक्रम,बुद्धीचातुर्य आणि मुत्सद्देगिरी यांचे अलौकिक संमिश्रण होय.अवघ्या ५० वर्षीय जीवित कालखंडामध्ये शिवरायांनी जे अद्वितीय कार्य केले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.

विजापूरचे सरदार असलेल्या शहाजीराजे यांचा १५ वर्षाचा बाणेदार पुत्र इतरांची चाकरी करण्यापेक्षा आपल्या आई जिजामातेच्या स्वराज्यप्रेम,स्वराज्याभिमान या संस्कारबीजाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा करतो,मावळ प्रांतातील सर्व जातीतील अठरापगड मावळ्यांना प्रेरित करून संघटित करतो आणि वयाच्या १७ व्या वर्षी १६४७ साली तोरणा किल्ला जिंकता-जिंकता स्वराज्याच्या मंगलमय इतिहासात कोंडाणा, पुरंदर,राजगड सारखे एक-एक किल्ला जिंकतो. शिवरायांमधील संघटन कौशल्य आणि जिवाभावाची माणसे जोडण्याची कला,खरोखरच आदर्शवत होती.चहुबाजूंनी मुघल,आदिलशाह,निजाम शाह, सिद्दी, पोर्तुगीज या सत्ताधाऱ्यांनी घेरले असतांनाही स्वतःचे राज्य निर्माण करण्याचा ध्यास आणि त्यासाठी कठोर शर्थीसह प्रयत्नांची पराकाष्ठा शिवरायांनी केली. जिंकलेले किल्ले आदिशहाने ओलीस ठेवलेल्या पित्याच्या रक्षणार्थ परत करण्याचे औदार्य त्यांनी दाखविले.कोणत्या मोहिमेत कुणाकडून सुयोग्य काम करवून घेऊन मोहीम फत्ते करायची याची सुयोग्य जाण त्यांना होती.आदिलशहा,मोगल यांच्या विरुध्द लढण्या अगोदर स्वकीयांचा बंदोबस्त करण्यासाठी जावळीच्या मोऱ्यांचा शिवरायांनी पराभव केला आणि जावळीच्या भागावर आपले वर्चस्व सिद्ध केले.

शिवरायांच्या महत्वाकांक्षेवर आवर घालण्यासाठी विजापूरच्या आदिलशाहने १६५९ साली पाठविलेल्या अफजलखान या पराक्रमी सरदाराचा बुद्धीचातुर्याने केलेला निप्पात अतुलनीय आहे.या मोहिमेत महाराजांचे प्राण रक्षण करणारा ‘होते जीवाजी म्हणून वाचले शिवाजी‘ सत्य ठरविणारे जीवा महाला सारखे स्वामीनिष्ठ स्वराज्यासाठी मजबूत खांबा प्रमाणे ठरले होते.खानाचा धुव्वा उडविल्यावर सिद्धी जोहरचे प्रचंड आक्रमण १६६० साली शिवरायांनी मोठ्या शिताफीने परतावून लावले. दिल्लीच्या मुगल बादशहा औरंगजेबचा धूर्त सरदार शाहिस्तेखान स्वराज्यावर चाल करून आला असताना पुण्याच्या लाल महालात ५ एप्रिल १६६३च्या रात्री मोठ्या हिमतीने शाहिस्तेखानाची बोटे छाटावी ती शिवरायांनीच! १६६४ साली सुरतेची पहिली लूट स्वराज्याची विस्कळतिता सांभाळण्यासाठी होती.बलाढ्य मिर्झाराजे जयसिंग सोबत प्रत्यक्ष रणांगणावर लढण्या ऐवजी १६६५च्या तहातून स्वराज्यवारील संकट दूर करणे शिवरायांनी संयुक्तिक मानले.केलेल्या तहानुसार शिवरायांना आग्र्याला जावे लागले.आपल्या पदायोग्य सन्मान न मिळाल्याने औरंगजेबाच्याच भर दरबारात औरंजेबाला खरे-खोटे सूनविण्याचा बाणेदारपणा दाखवावा,तो शिवरायांनीच ! आगऱ्याच्या कैदेतून सुटका करून घेण्याची फळ-मिठाईचे आशीर्वादाचे पेटारे ही अभिनव योजना शिवरायांच्या कल्पकतेची साक्ष देणारी आहे.१६७० साली दुसऱ्यांदा सुरत स्वारीच्या वेळी सर्वसामान्यांना कोणतीही झळ न पोहचविता श्रीमंत व्यापाऱ्यांना लुटून त्याचा उपयोग शिवरायांनी स्वराज्य बांधणीसाठी केला.सर्व किल्लयावर विश्वासू,शूर किल्लेदार नेमून स्वराज्याला बळकटी आणली.परकीय शत्रूचे भविष्यातील आव्हान पेलण्यासाठी जलदुर्गाचे महत्व लक्षात घेता जलदुर्ग निर्मितीवर त्यांनी भर दिला.स्वराज्याला सर्व राजे राजवाड्यांनी मान्यता द्यावी यासाठी शिवरायांनी रयतेसाठी १६७४ साली स्वतःचा राज्यभिषेक करून घेऊन स्वराज्याला एक अधिस्वीकृती मिळवून घेतली.१६७४ पासून राज्यभिषेक शिव शक सुरु केले. राज्यकारभाराची सुव्यवस्था ठेवण्यासाठी राजे शिवाजी यांनी अष्टप्रधान मंडळाची केलेली निर्मिती, ही त्यांच्या राजकीय मुत्सद्देगिरीची साक्ष आहे.राज्य कारभाराची व्यवस्था सोबतच घोडदळ व पायदळ यांची उभारणी शिवरायांनी केली.पगारी सैन्य निर्माण करून शिवरायांनी जहागिरी,सरदारकी ही वतन-प्रदेश वाटणीची पद्धत मोडीत काढली.परकीय इंग्रज,पोर्तुगीज यांच्या बंदोबस्तासाठी छत्रपतींनी आरमारदल उभारून सिंधुदुर्ग,विजयदुर्ग सारखे किल्ले बांधून इतिहासातील काळाच्या पुढे चालणारा अद्वितीय पुरुष म्हणून आपली भूमिका सिद्ध केली.राजे शिवाजी सर्वसामान्य रयतेच्या सुखासाठी झटले, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी झटले. त्यांनी आपल्या सेवकांवर मातृ-पितृ कृपाछत्राप्रमाणे माया केली. शेतकऱ्यांना माफक असा शेतसारा लावून त्याच्या उत्कर्षासाठी प्रयत्न केला.आपल्या स्वराज्यात कोणताही धार्मिक-जातीय भेदाभेद न पाळता त्यांनी धार्मिक सहिष्णुता जपली,सामाजिक ऐक्य टिकविले.शत्रूपक्षाची गुप्त माहिती मिळवण्यासाठी बहिर्जी नाईक यांच्या नेतृत्वाखाली हेरखाते निर्माण करणारे शिवराय मध्ययुगीन भारतातील ‘प्रगत डिटेक्टिव्ह’ होते.

# संजीवनी मराठेः गीतरचना व सुस्वर काव्यगायन!

संजीवनीजींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख व स्तुती करणे आवश्यक आहे. मुलांचे अनुभवविश्व साकार करण्याचे श्रेय त्यांनी प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊ न देता अस्सलपणे मिळविले. महाराष्ट्र शासनाने ’बरं का ग आई’ व ’हसू बाई हसू’ या त्यांच्या बालगीत संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला. त्यांच्या जयंतीनिमित्त श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा ज्ञानवर्धक लेख वाचकांच्या सेवेत... संपादक.

## (संज़ीवनी मराठे जयती विशेष)

संजीवनी रामचंद्र मराठे या विशेषकरून गीतरचना व सुस्वर काव्यगायन यांसाठी मान्यता पावलेल्या एक आधुनिक मराठी कवयित्री. संजीवनीजींचा जन्म दि.१४ फेब्रुवारी १९१६ रोजी महाराष्ट्रातील पुणे या शहरात झाला. त्यांचे शिक्षण पुण्यात झाले. शाळकरी वयातच त्यांनी कविता करावयास सुरुवात केली. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या त्या जीए- गृहीतागमा व एमए होत्या. आयुष्याच्या उत्तरार्धात त्या आणि त्यांचे पती खानापूर-बेळगाव सोडून सांगलीस गेले. सांगलीत राम मंदिराजवळच त्यांचा राम कृपा नावाचा बंगला होता. त्यांनी काही दिवस सांगलीच्या शाळेत शिक्षिकेचे काम केले. त्यांना मिना, भारती, अंजू या तीन मुली आणि प्रताप नावाचा मुलगा होता. प्रताप हा वैमानिक होता. अंजूने लग्नानंतर पाठविलेली पत्रे संजीवनीजींनी संपादित करून प्रकाशित केली. त्यांच्या रचनांचा सन १९३२मधील काव्य-संजीवनी हा त्यांचा पहिला संग्रह असला, तरी त्यांची रसिकांना खरी ओळख झाली ती राका या संग्रहातून- काव्य-संजीवनीतील निवडक रचनाही त्यात पुनर्मुद्रीत केलेल्या आहेत. संजीवनीजींनी काव्यलेखनास प्रारंभ केला तो काळ तांबे व रविकिरण मंडळ यांच्या प्रभावाचा होता. साहजिकच तांबे यांच्या गीतशैलीची सार्वत्रिक मोहिनी आणि रविकिरण मंडळाने निर्माण केलेल्या काव्यगायनास अनुकूल असे वातावरण यांच्या संस्कारांतून त्यांची कविता गेय रूपात अवतरली.

त्यांच्या गोड गळ्याची तिला उत्तम जोड मिळाली. रवींद्रनाथ टागोरांच्या काव्याची मोहिनीही त्यांच्यावर होती. तांबे यांची जीवनसृष्टी, सौंदर्यशक्ती, तसेच शब्दकला, आविष्कराचे वळण यांचा संजीवनीजींच्या कवितेवरील संस्कार स्पष्ट आहे. तसेच मनोरमा रानडे यांच्या काव्यातून आधुनिक सुशिक्षित, सुसंस्कृत स्त्रीमनाचा विशेषत: तिच्या प्रणयभावनेचा, जो एक सहजमोकळा आविष्कार घडण्यास प्रारंभ झाला होता. त्याची परंपराही त्यांच्या कवितेत पृथगामी स्वरूपात प्रवाहित झालेली दिसते. प्रणयानुभवातील तरल स्पंदने, त्याची स्वप्निलता, अलौकिकता व्यक्त करणारी त्यांची कविता अस्सलपणामुळे व वेगळेपणामुळे विशेष मनोवेधक ठरली. ‘शांत सागरी कशास उठविलीस वादळे?’ हे गीत याचे उत्कृष्ट प्रातिनिधिक उदाहरण होय.

त्यानंतरच्या त्यांच्या कविता संसार, छाया, चित्रा व चंद्रफूल या कवितासंग्रहांतून प्रकाशित झाल्या. भावपुष्प व परिमला हे त्यांचे गीतसंग्रह होत. संजीवनी हा त्यांच्या निवडक कवितांचा संपादित संग्रह होय. तसेच काही बालगीतसंग्रह व लाडकी लेक ही अनुवादित बालकादंबरिका यांचाही त्यांच्या साहित्यसेवेत समावेश होतो. स्वप्नाळू प्रणयिनीचे व संसारी गृहिणीचे भावविश्व चित्रित करणारी त्यांची कविता प्राधान्याने स्वत:तच केंद्रित झाली आहे. आपल्या भाविश्वाचे भान विसरून स्वत:पलीकडच्या एखाद्या अनुभवाशी एकरूप झाल्याची ‘एक सानशी कळशी’ सारखी उदाहरणे मोजकी आहेत. आत्मप्रतीतीच्या परिघाबाहेर गेले, की त्यांची कविता सांकेतिक व क्षीण होते. हा राष्ट्रप्रेमाचा आविष्कार त्यांच्या रचनेतून स्पष्ट होतो.

संजीवनी मराठेंच्या काव्यातून प्रीतीच्या पृथगात्म चित्रणाच्या बरोबरीने सौंदर्यपूजक वृत्ती, सश्रद्धा, वात्सल्यादि स्त्रीसुलभ भाव इत्यादींचा आविष्कारही आढळतो. त्यांचे अनुभवविश्व तसे साधे, व्यापक व व्यामिश्रता या दृष्टीने मर्यादित असले तरी या कवयित्रीने आत्मप्रत्ययाशी व स्वत:च्या काव्यप्रकृतीशी प्रामाणिक राहून निर्मितीतील स्वत्व जपले, हे महत्त्वाचे! त्यांच्या अनुभवविश्वाला असलेला निरागसतेचा रंग हे त्याचे एक वेधक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या पुढील काळातील रचनांवर मराठी काव्यातील नवीन प्रवाह, स्थित्यंतरे यांचे बाह्य संस्कार झालेले दिसतात. यातून अनुभवातील अंतर्मुखता तसेच रचनेतील साक्षेप व संयम वाढलेला दिसला, तरी त्या कवितेचा गाभा तोच राहिला आहे. संजीवनीजींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख व स्तुती करणे आवश्यक आहे. मुलांचे अनुभवविश्व साकार करण्याचे श्रेय त्यांनी प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊ न देता अस्सलपणे मिळविले. महाराष्ट्र शासनाने ’बरं का ग आई’ व ’हसू बाई हसू’ या त्यांच्या बालगीत संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला.

संजीवनी मराठे यांचे महाराष्ट्रातील विद्येचे माहेरघर समजल्या जाणारे पुणे येथे दि.१ एप्रिल २००० रोजी निधन झाले.

!! जयंती निमित्त त्यांना
विनम्र अभिवादन !!

# दिल्लीतील चेंगराचेंगरी : कोण जबाबदार? अंधश्रद्धा की प्रशासनाची अक्षम्यता?


**शनिवारी** दिल्लीतील रेल्वे स्थानकात झालेल्या चेंगराचेंगरीत जवळपास वीस लोकांचा मृत्यू झाला. मृतांचा आकडा अद्याप निश्चित नाही, आणि या दुर्घटनेच्या असंख्य कथा समोर येत आहेत. या घटनेने मागील अनेक घटनांची आठवण करून दिली. प्रयागराज कुंभमेळ्यात शाही स्नानाच्या वेळी झालेली चेंगराचेंगरी, विविध धार्मिक यात्रा, आणि देवस्थानांवरील प्रचंड गर्दीमुळे झालेल्या दुर्घटना. प्रश्न हाच आहे की, अशा दुर्दैवी घटनांना जबाबदार कोण? अंधभक्त की प्रशासन?

अंधश्रद्धा आणि धार्मिक भ्रम

या देशात एक विचित्र समजूत आहे. गंगेत स्नान केल्याने पाप नष्ट होते. पण ही अंधश्रद्धा का आणि कशी निर्माण झाली? संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत कबीर यांनी पुण्य आणि पापाची खरी व्याख्या करून दिली आहे. त्यांनी स्पष्ट सांगितले की,

**‘जे का रंजले गांजले ।**
**त्यासी म्हणे जो आपुले ।**
**तोचि साधू ओळखावा ।**
**देव तेथेचि जाणावा ।**

म्हणजेच, दुसऱ्याच्या सेवेतच पुण्य आहे, गंगेत डुबकी मारण्यात नाही! परंतु तरीही लाखो लोकं हा विवेक बाजूला ठेवून गंगेच्या स्नानासाठी जिवावर उदार होतात आणि हजारो मृत्युमुखी पडतात. गंगेच्या पाण्यात कितीही स्नान केले तरी देशातील भ्रष्टाचार, जातीभेद, अन्याय आणि शोषण संपेल का? एखाद्या गरीब विधवेच्या मदतीला धावून जाणे, आई-वडिलांची सेवा करणे, शिक्षण,न्यायासाठी झटणे यातून पुण्य मिळेल की



नुसत्या पाण्यात डुबकी मारून? हा विचारच कुणी करत नाही.

**प्रशासनाची अक्षम्यता आणि निष्काळजीपणा** – चेंगराचेंगरी फक्त अंधश्रद्धेमुळे होत नाही, तर त्याला प्रशासनाची अक्षम व्यवस्थापन यंत्रणा देखील जबाबदार आहे. गर्दी नियंत्रणासाठी कोणतीही प्रभावी व्यवस्था नसते, सुरक्षा यंत्रणा कुचकामी ठरतात, आणि हजारोंचा जीव धोक्यात जातो. प्रत्येक वेळी सरकार सुरुवातीला अफवा असल्याचे सांगते, मग मृतांचा चुकीचा आकडा सांगते, आणि शेवटी घटना विस्मरणात जाते. जर प्रशासनाने आधीच योग्य नियोजन केले असते, गर्दी नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना केल्या असत्या, तर प्रयागराज असो किंवा दिल्ली असो, हजारोंचा जीव धोक्यात गेला नसता. या देशाची संस्कृती श्रेष्ठ आहे का?- हिंदूसाठी गंगास्नान पुण्यप्राप्तीचा मार्ग आहे, मग इतर धर्मीय लोकांनी काय करावे? त्यांच्यासाठी कोणता पर्याय आहे? का फक्त गंगेच्या नावावर धर्म मोठा मानायचा? या देशाची खरी संस्कृती श्रेष्ठ असेल, तर अजूनही लोकांना पाप-पुण्याच्या फोल कल्पनांमध्ये अडकवून ठेवले जात आहे का? हीच संस्कृती खऱ्या अर्थाने श्रेष्ठ असेल, तर संत तुकाराम, संत कबीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकांना सत्याचा मार्ग दाखवण्यासाठी संघर्ष करावा लागला नसता.

**अंधश्रद्धा विरुद्ध विवेक : सत्याची वाट कोण दाखवणार?** – जर देशाने संत तुकाराम, फुले, शाहू, डॉ. आंबेडकर या महापुरुषांचे विचार खरोखर अंगीकारले असते, तर आजही अशा दुर्घटना घडल्या नसत्या. अंधश्रद्धेमुळे लाखो लोक आपला जीव गमावत असताना, विवेकवादी विचारांचा प्रचार आणि प्रसार का केला जात नाही? शिक्षणामुळे माणूस सुशिक्षित होत असला, तरी तो अजूनही सुज्ञ झाला नाही, हीच मोठी शोकांतिका आहे. गंगेत स्नान करून पुण्य मिळेल का? की आई-वडिलांची सेवा, समाजकार्य, शिक्षण, आणि अन्यायाविरोधातील लढा यातून खरे पुण्य मिळेल? या प्रश्नाचा विचार आज प्रत्येकाला करावा लागेल. नाहीतर दिल्ली, प्रयागराज आणि पुढेही अनेक ठिकाणी हजारोंचे मृत्यू होत राहतील, आणि त्यावर फक्त सरकारची निरर्थक आश्वासने आणि श्रद्धांजली वाहिल्या जात राहतील!

**– रतनकुमार साळवे**
छत्रपती संभाजीनगर
९९२३५०२३२०

# अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकास निधी उपलब्ध करुन देऊ- पालकमंत्री संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे उत्तम स्मारक पुतळ्याच्या रुपाने उभे रहावे. तसेच सर्वोपयोगी अद्यावत सभागृह उभारले जावे. आम्ही सर्व लोकप्रतिनिधी एकविचाराने अशा लोकोपयोगी कमांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देऊ,असे आश्वासन राज्याचे सामाजिक न्याय तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज येथे दिले.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊसाठे यांचा पूर्णाकृती पुतळा आणि परिसर सुशिभिकरण या कामाचे भुमिपूजन आज पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागासवर्ग कल्याण व दुग्धविकास मंत्री अतुल सावे, मनपा आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत, संजय ठोकळ, राजेंद्र जंजाळ तसेच अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, पुतळ्याचे सुशोभिकरण व परिसराचा विकास ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. कदाचित हे चांगले काम माझ्या हातून व्हावे असे होणार असावे. आता सर्व लोकप्रतिनिधी हे एक विचारांचे आहेत. अशा चांगल्या कामासाठी आम्ही निधी आणून हे काम पूर्ण करु. समाज हिताच्या या कामाच्या गुणवत्तेत तडजोड करणार नाही. उत्तम दर्जाचे काम करु. पुतळा, परिसर विकास व सभागृह अशा कामांसाठी निधी उपलब्ध



करुन देऊ,असे आश्वास पालकमंत्री शिरसाट यांनी दिले. इमाव कल्याण मंत्री अतुल सावे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे समाजाला बोध देणारे साहित्य आहे. हे साहित्य सर्वापर्यंत पोहोचविले पाहिजे. प्रत्येकाने ते वाचायला हवे. अण्णाभाऊ साठे यांचे यथोचित स्मारक आणि परिसराच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी आपण वचन बद्ध आहोत,असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक संजय ठोकळ यांनी केले. पंचशिला भालेराव व त्यांच्या कलापथकातील कलावंतांनी अण्णाभाऊ साठे यांची गाणी सादर केली. विनोद साबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सेलूत सामान्य ज्ञान परीक्षेला २००० विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद

## शिवजन्मोत्सव उपक्रमातून राष्ट्रीय एकात्मता व धार्मिक सहिष्णूतेचे प्रतिबिंब



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

(सेलू) येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त शिवाजी राजांच्या जिवन चरित्रावर आधारीत रविवार दि १६ फेब्रुवारी रोजी आयोजित तालुका स्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षेत तालुक्यातील विविध शाळा–म हाविद्यालयातील व सर्व जातीधर्मातील २००० विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त व उदंड प्रतिसादातून राष्ट्रीय एकात्मता व धार्मिक सहिष्णूतेचे प्रतिबिंब उमटले.

येथील नूतन विद्यालय व केशवराज बाबासाहेब विद्यालय अशा दोन केंद्रावर वर्ग ५वी ते ६वी, ७ वी ते ८वी व ९वी ते १२ वी अशा तीन गटात आयोजित सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा यशस्वीपणे पार पडल्या.

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या काळात सध्य स्थितीत मोबाईल च्या आहारी गेलेल्या व वाचनापासून दुरावत चाललेल्या शालेय विद्यार्थ्यांना पुन्हा वाचनाच्या प्रवाहात आणून त्यांच्या मनात स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण करण्यासाठी शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या विचार व कार्यावर आधारित या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या परीक्षा यशस्वी करण्यासाठी केंद्र संचालक म्हणून विलास खरात,रामराव गायकवाड, किरण जाधव , तानाजी भोसले, रामराव बोबडे यांनी काम पाहिले. तालुक्यातील विविध शाळांमधील १०० शिक्षकांनी पर्यवेक्षक म्हणून उत्स्फूर्तपणे पर्यवेक्षण कार्यात सहभाग नोंदवला. तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या डासाळा, रवळगाव, चिकलठाणा ,वालूर, मोरेगाव, CPS कन्या, उझड सेलू या केंद्रातील विविध शाळा तसेच खाजगी व्यवस्थापनाच्या यासेर उर्दु, डॉ झाकिर हुसेन विद्यालय, नूतन विद्यालय, नूतन कन्या, यशवंत विद्यालय, के बा विद्यालय, न्यू हायस्कूल, शारदा विद्यालय, ज्ञानतिर्थ विद्यालय, नितीन माध्य विद्यालय , नूतन महाविद्यालय,यशवंत महाविद्यालय,स्वामी विवेकानंद शाळा, विद्यानिकेतन शाळा अशा विविध शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

स्पर्धा परीक्षा यशस्वीतेसाठी समितीचे अध्यक्ष गोविंद काष्टे, उपाध्यक्ष अप्पूसेठ सोळंके, सचिव रामेश्वर शेरे, प्राचार्य डॉ शरद कुलकर्णी, मुख्याध्यापक सर्जेराव लहाणे, पर्यवेक्षक रोहीदास मोगल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत देशमुख, आत्माराम हारकळ, सुरेश कवडे, गणेश माळवे,सुभाष मोहकरे, किरण खरात, नरेश पाटील, योगेश ढवारे , सर्जेराव सोळंके, रणजीत गायके, दत्तात्रय यादव, सिध्देश्वर मुरकुटे , बाबासाहेब काष्टे, मुकुंद सोळंके आदींनी परिश्रम घेतले. विजेत्या स्पर्धकांना १९ फेब्रुवारी शिवजयंतीदिनी रोख पारितोषिके , सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

# दिल्लीतील साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने अभिजात मराठीचा 'ऑनलाईन जागर'!

## व्हिडिओ पाठवून सहभागी होण्याचे आवाहन

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

दि. २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्ली येथे होणा ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने अभिजात म राठीचा 'ऑनलाइन जागर' हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात आपल्या कलागुणांचा व्हिडिओ शेअर करून देश विदेशातील मराठी माणसांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे.

आपण स्वतः कवी, लेखक, कलाकार, गायक असाल तर आपल्या स्वरचित कवितेचा अथवा आपल्या कलाकृतीचा एक सुंदर व्हिडिओ तयार करून आम्हाला पाठवा. केवळ आपल्याच कविता नाही तर इतर मान्यवर कवींच्या कवितांचे सादरीकरणही ( वाचन )आपण करू शकता. याबरोबरच गझल वाचन, गायन, लोककला सादरीकरण अशा अनेक स्वरूपात आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. अभिजात मराठीच्या या ऑनलाईन जागरामध्ये आपण अभंग, पोवाडे, नाट्यछटा, लघुकथा, गायन, भारुड आधी कलांच्या माध्यमातून सहभागी होऊ शकता. अभिजात मराठीच्या या उत्सवात आपला सहभाग हा आपल्या भाषेचा गौरव वाढविणारा ठरेल. तर चला मग करा रेकॉर्ड आपला व्हिडिओ आणि पाठवा आम्हाला. आपले व्हिडिओ हे माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'महासंवाद' या पोर्टल वर आणि महासंचालनालयाच्या राज्यभरातील कार्यालयांच्या अधिकृत समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करण्यात येतील.

आपले व्हिडिओ इथे पाठवा
ईमेल: dgirdlo@gmail.com
या ईमेलवर अथवा या व्हॉट्सअँप क्रमांकावर. ९८९२६६०९३३ आणि ७५०४६९६७८६.

महाराष्ट्राला साहित्याची समृद्ध परंपरा लाभली आहे. ९८ वे अखील भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठी भाषेच्या श्रीमंतीचा उत्सव साजरा करण्याची संधी आहे. आपल्या शब्दांनी आणि कलाकृतींनी ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अधिक संस्मरणीय बनवावे, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने करण्यात येत आहे. माहिती व जनसंपर्क म हासंचालनालयाच्या खालील समाजमाध्यमांवर उत्कृष्ट व्हिडिओ व कलाकृतीला प्रसिद्धी देण्यात येईल.

# पाणलोट यात्रेस गोळेगावपासुन सुरुवात

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत पाणलोट यात्रेचा प्रारंभ मौजे. गोळेगाव, तालुका खुलताबाद येथून शनिवारी (दि.८) करण्यात आला.

आयुक्त, मृद व जलसंधारण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा प्रकाश खपले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. अपर आयुक्त (जलसंधारण) मृद व जलसंधारण आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर नितीन दुसाने, प्रादेशिक जिल्हा जलसंधारण अधिकारी अजित कुमार परांडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पी. आर. देशमुख, जिल्हा जलसंधारण अधिकारी जालना एस .एस. वाघमारे, जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा सदस्य सचिव समन्वय अधिकारी नेरेंद्र कटके, प्रभारी उपविभागीय कृषी अधिकारी वैजापूर वेंकटेश ठके, तालुका कृषी अधिकारी खुलताबाद ज्ञानेश्वर तारगे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी खुलताबाद लांडगे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी पैठण राठोड, सहाय्यक जिल्हा जलसंधारण अधिकारी शेख, उपविभागीय जलसंधारण अधिकारी छत्रपती संभाजीनगर श्रीमती अरदवड, सरपंच गोळेगाव श्रीमती आवटे, उपसरपंच संतोष जोशी आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गोळेगाव येथील शेततळे कामाचे लोकार्पण, भूमिपूजन करण्यात आले.तसेच म हिला बचत गटांच्या स्टॉल्सची पाहणी करून उपस्थितांना पाणलोटबाबत मार्गदर्शन केले. उपस्थितांनी पाणलोट शपथ घेतली. शालेय विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कलापथकांनी पाणलोट जनजागृतीसाठी पोवाडा सादर केला.

मंडळ कृषी अधिकारी पैठण पाडळे, कृषी पर्यवेक्षक खुलताबाद गायट, डेंगळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक मिलिंद वानखेडे, तालुका समन्वयक किशोर डी.कोल्हे, तालुका समन्वयक सुनिल एस. खोतकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक जालना टी. एल. भोजने तसेच जलसंधारण विभागातील अधिकारी/ कर्मचारी तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, म हिला बचत गटाच्या महिला, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपविभागीय जलसंधारण अधिकारी लांडगे यांनी आभार मानले.



# समाजातील सौहार्द वाढविण्यासाठी उपक्रम राबवा- गृहराज्यमंत्री योगेश कदम



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ (जिमका)- आपल्या राज्यात सामाजिक सौहार्द वाढावे यासाठी पोलीस दलाने सर्व समाजातील लोकांना विशेषतः युवकांना एकत्र आणून विविध उपक्रम राबवावे व सामाजिक एकोपा निर्माण करावा,असे निर्देश राज्याचे गृह(शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज येथे दिले.

येथील पोलीस आयुक्तालयात आयोजीत आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस पोलीस आयुक्त प्रवीण पवार, उपायुक्त नितीन बगाटे, प्रशांत स्वामी, शिलवंत नागरेकर आदी सर्व पोलीस अधिकारी उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय हद्दीतील पोलीस दलाच्या कामगिरीचा आढावा श्री. कदम यांनी घेतला. त्यात गुन्ह्यांचा तपास, प्रतिबंधात्मक कारवाई, वाहतुक, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, जातीय दंगली, अंमली पदार्थ, दामिनी पथक, भरोसा सेल अशा विविध विषयांचा आढावा घेण्यात आला.

बैठकीत माहिती देण्यात आली की, गेल्यावर्षभरात झालेल्या ५९४७ दाखल गुन्ह्यांपैकी ४७०९ गुन्ह्यांचा तपास पूर्ण झाला आहे. ५ लाख ६२ हजार ०९१ वाहनांवर कारवाई करुन ४ कोटी २८ लाख ७० हजार ८५० रुपये दंड आकारण्यात आला आहे.वाढते औद्योगिकीकरण आणि वाढते शहरीकरण यामुळे गुन्ह्यांचे प्रमाण वाढतांनादिसत आहे.

आर्थिक गुन्हेगारी, सायबर गुन्हेगारी, अंमली पदार्थ असे गुन्हेही घडत आहेत. वर्षभरात अंमलीपदार्थ संदर्भातील १३४ गुन्हे नोंदविण्यात आले. ४० लाख ४७ हजार ६५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन २२३ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले. शहरी भागात ड्रोन पेट्रोलिंग, कमांड कंट्रोल सेंटर द्वारे सर्व हालचालींवर नियंत्रण ठेवले जाते अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

श्री. कदम म्हणाले की, औद्योगिक गुंतवणूक वाढत असतांना येथिल सामाजिक सौहार्द वाढविणे व सलोखा टिकवून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व समाजातील युवकांना, व्यक्तिंना एकत्र आणून उपक्रम राबवावे, त्यांचे परस्पर विचार देवाण घेवाण वाढवावी. त्यातून हे सौहार्द वाढून शांतता व सलोखा प्रस्थापित होईल असे पहावे. ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या सात कलम कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. जिल्ह्यात अंमली पदार्थांबाबत कडक कारवाई करण्यात यावी. त्यात शिक्षक, पोलीस अधिकारी, पालक यांचाही सहभाग घ्यावा. तसेच जनजागृतीवर अधिक भर द्यावा.

जिल्ह्यात बांगलादेशी अथवा रोहिंग्यांच्या रहिवासाबाबत असलेल्या प्रकरणांचा शोध घेण्यात यावा. पोलिस कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेला मुद्देमाल अनेक वर्षे तसाच पडून राहतो. त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात यावी, यासाठी राज्यशासन संयुक्तिक धोरण ठरवित आहे. त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. ई- ऑफिस प्रणालीचा अधिक वापर वाढवावा. जिल्ह्यात उद्योगांची गुंतवणूक वाढत असतांना अनेक लोक स्थलांतरीत होऊन येथे येतील. लोकसंख्या वाढेल अशा परिस्थितीत येथील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षमपणे हाताळण्यासाठी पोलीस दलाला अधिक अत्याधुनिक करण्यात येईल,असेही श्री. कदम यांनी सांगितले.

बैठकीनंतर श्री. कदम यांच्या हस्ते चैतन्य तुपे अपहरण तपास कामांत काम गिरी बजावणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यातून ४७८ उमेदवारांची निवड

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे आयोजीत पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ४७९ उमेदवारांची निवड करण्यात आली, असे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे. ३३१ जणांची प्राथमिक तर १४८ जणांची अंतिम निवड झाली आहे.

एम.आय.डी.सी वाळूज येथील श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी, हायटेक महाविद्यालय परिसर येथे रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. उपआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय श्रीमती विद्या शितोळे यांनी उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन केले.सहायक संचालक, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकार श्रीमती ऋजुता बनकर यांनी प्रधानमंत्री कार्यप्रशिक्षण योजनेची माहिती दिली व उमेदवारांना सदर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.मसिआचे अर्जुन गायकवाड,भारतीय ग्रामीण पुनर्रचना या संस्थेचे सचिव व कार्यक्रमाचे अध्यक्ष एकनाथराव जाधव यांनी मार्गदर्शन केले. या मेळाव्यात वॉकहार्ड रिसर्च सेंटर, रत्नप्रभा मोटर्स, फोर्ब्स प्रेसीशन टूल्स ॲड मशिन पार्ट्स., लिभेर अप्लायंन्सेस प्रा.लि., अलंकार ग्रूप, ग्रीव्हज कॉटन प्रा.लि., वोकहार्डखार्ड लि., पॅरासन मशीनरी इं. प्रा.लि., नवभारत फर्टीलायझर्स लि, एक्सेल प्लेसमेंट, पगारीया ऑटो, देवगीरी नागरी सहकारी बँक लि., अजंता फार्मा लि., सवेरा फार्मा, मायलन लॅबोरेटरी लि. ओम साई मॅन पावर,स्टरलाईझ टेक्नॉलॉजी, लुपीन ली., आमाधने प्रा.लि इंडूरन्स ली., एक्सीडी इंडिया ली. इत्यादी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नामांकित नियोक्त्यांनी सहभाग दर्शवून उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. या रोजगार मेळाव्यातून ३३१ उमेदवारांची प्राथमिक व १४८ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली,असे कळविण्यात आले आहे.

# हातमाग कापड स्पर्धेसाठी प्रवेशिका मागविल्या

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शासनाच्या वस्त्रोद्योग विभागामार्फत हातमाग कापड उत्कृष्ट नमुन्याची विभागीय हातमाग कापड स्पर्धा २०२४-२५- गुरुवार दि.२० रोजी आयोजीत करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी मंगळवार दि.१८ पर्यंत विणकरांनी आपले कापडाचे वाण पाठवावे,असे आवाहन प्रादेशीक उपायुक्त प्रशांत सदाफुले यांनी केले आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील हातमाग विणकर सहकारी संस्था, महामंडळे, खाजगी व इतर क्षेत्रातील हातमाग विणकरांनी हातमागावर तयार केलेल्या कापडाचे वाण नमुने प्रादेशिक उपायुक्त व्त्रोद्योग, छत्रपती संभाजीनगर, बाळासाहेब पवार सहकार भवन, तिसरा मजला, जाफरगेट, छत्रपती संभाजीनगर येथे मंगळवार दि.१८ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत जमा करावेत. विभागातील अधिकाधिक हातमाग विणकरांनी यास्पर्धेत सहभागी व्हावे,असे आवाहन प्रादेशीक उपायुक्त वस्त्रोद्योग प्रशांत सदाफुले यांनी केले आहे.

# शिक्षण विभागाचा शिक्षकांवरच भरोसा नाय काय?

## केंद्रसंचालक,पर्यवेक्षक बदली मुळे सर्वत्र नाराजी; जिल्ह्यात ४२ केंद्रांची अदलाबदली

**परभणी (अट्टल मत प्रतिनिधी)**

दि २१ फेब्रुवारी पासून सुरू होत असलेल्या दहावीच्या परीक्षेचे नियोजन प्रशासनाकडून सुरू झाले आहे.यामध्ये कॉप्यांना आला घालण्यासाठी अनेक ठिकाणी केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदली करण्यात आले आहेत.परंतु यामध्ये अनेक शाळा या किरकोळ प्रकार किंवा काही गोंधळ नसतांनाही केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलण्यात आल्याने शिक्षकांसह मुख्याध्यापकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. शिक्षण विभागाचा शिक्षकांवरच भरोसा नाय काय? असे म्हणण्याची वेळ आली आहे.राज्यभरात कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले जात आहे. परंतु यामध्ये शिक्षक व मुख्याध्यापक भरडले जात असल्याचे चित्र आहे. सेलू तालुक्यात शहरी भागात अतिशय कडकपणे परीक्षा घेण्यात येतात.परंतु छोट्या छोट्या कारणांचा आधार घेऊन केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलले जात आहेत.कारण कोणताही शिक्षक कॉप्यांना प्रोत्साहन देऊ शकत नाही. त्यातच ज्या केंद्रावर अनेकवेळा कॉप्याचे प्रकार घडलेत अशा केंद्रावर बदल करणे संयुक्तिक आहे.परंतु क्षुल्लक कारणावरून केंद्रसंचालक बदलणे यामुळे नाराजी पसरत आहे. कमीतकमी केंद्रसंचालक तरी त्या त्या शाळेवर ठेवणे आवश्यक आहे. कारण केंद्रसंचालक बदलल्यास नवीन शाळेतील भौतिक सुविधा,सुरक्षा व्यवस्था याची माहिती नसते.यामुळे केंद्रसंचालकांना त्रास होण्याची शक्यता आहे.अतिशय कडकपणे परीक्षा घेत आहोत असा अविर्भाव आणत असतांना मुख्याध्यापकांच्या समोर येणाऱ्या समस्यांचा विचार मात्र केलेला दिसत नाही. परीक्षा काळात केंद्रसंचालक, पर्यवेक्षक बदल्यांच्या निर्णयाला शिक्षक संघटनांनी देखील विरोध केला परंतु प्रशासनाने मात्र आपलाच होरा कायम ठेवल्याने नाराजी पसरत आहे.

आज दि १५ फेब्रुवारी रोजी दहावीच्या परीक्षेचे साहित्य वाटपासाठी येथील शिवाजी महाविद्यालयात झालेल्या केंद्रसंचालकांच्या बैठकीत शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसह बोर्डाचे अधिकारी सुद्धा उपस्थित होते.या बैठकीत देखील काहींनी आपली समस्या मांडली. परंतु बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी थेट मुख्यमंत्र्यांच्या आदेशाचा व राज्य मंडळाच्या आदेशांचा संदर्भ देत केंद्रसंचालकांना कडक सूचना केल्या.तसेच प्रेमाने सांगण्याऐवजी कारवाईचेच जास्त उदाहरणे दिले.तसेच केंद्रसंचालकांच्या कुठल्याही तक्रारी एकूण घेतल्या जाणार नसून संबंधित केंद्राची सर्व जबाबदारी केंद्रसंचालकांची असल्याच्या सूचना दिल्या. परभणी जिल्ह्यात एकूण ४२ केंद्राचे केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलण्यात आले आहेत.

**ससाणेंच्या बोलण्यात टी एन शेषन यांचा उल्लेख** – या बैठकीत केंद्रसंचालकांना सूचना देतांना कडक अधिकारी म्हणून प्रसिद्ध असलेले योजना शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांनी आपल्या बोलण्यात ३ ते ४ वेळा दिवंगत निवडणूक आयुक्त टी एन शेषन यांच्या कार्यपद्धतीचा व नावाचा उल्लेख केला.टी एन शेषन यांनी जसे कडकपणे काम केले तसे काम केंद्रसंचालकांनी करावे असेही त्यांनी सांगितले.तसेच कायद्यातील सूचनांची उजळणी करून केंद्रसंचालकांनी जबाबदारीने काम करण्याच्या सूचना दिल्या.

# डिजीटल मार्केटींगवर मोफत प्रशिक्षण

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे दि.१७ ते २१ फेब्रुवारी या कालावधीत डिजीटल मार्केटींग याविषयावर पाच दिवसीय मोफत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी उद्यम रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे.

डिजीटल मार्केटींग म्हणजे काय? डिजीटल मार्केटींग मधील रोजगार संधी, डिजीटल मार्केटींग चा वापर करून आपला उद्योग व्यवसाय कसा मोठा करू शकता, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

ज्यांना या क्षेत्रात उद्योग व्यवसाय करण्याची इच्छा आहे त्यांनी सहभाग नोंदवावा. कार्यशाळेचे ठिकाण-मुख्य कार्यालय, अ -३८ एमआयडीसी एरिया, रेल्वे स्टेशन रोड जवळ, छत्रपती संभाजीनगर.

अधिक माहितीसाठी सौ.आशा कुरवाडे (७८८८०७०४१९ ), कार्यक्रम समन्वयक एमसीईडी यांच्याशी संपर्क करावा.असे आवाहन विभागीय अधिकारी सुदाम थोटे, जिल्हा प्रकल्प समन्वयक सौ. प्रतिभा निमकर यांनी केले आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.